महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४८ वा | दिनांक : २८/०७/२०२५ | वार : सोमवार

## वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला जाण्यात राजकारण पाहणे योग्य नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**नागपूर :** शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जाऊन त्यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. यावर अनेकांच्या प्रतिक्रिया येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील पत्रकारांनी विचारले असता, ते म्हणाले की यात राजकीय का पाहता? आमच्याही उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा आहेत. शुभेच्छा द्यायला जाणे, यात राजकारण पाहणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्राच्या मनात काय असा प्रश्न पत्रकारांनी देवेंद्र फडणवीस यांना विचारला, ते म्हणाले, महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला विधानसभेच्या निवडणुकीत दिसले आहे. आता महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल. मात्र, काही पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे, हे महाराष्ट्राच्या मनातले आहे असे म्हणणे योग्य नाही. असे म्हणत त्यांनी ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीवर भाष्य केले आहे.

पुण्यातील रेव्ह पार्टीत पोलिसांनी रविवारी पहाटे धाड टाकली. या कारवाईत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांचा जावई प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. यावर मुख्यमंत्री म्हणाले, मी पण ही माहिती माध्यमातून घेतली आहे, कारण मी सकाळपासून विविध कार्यक्रमांमध्ये फिरतो आहे. त्यामुळे मला ब्रीफिंग घेता आलेलं नाही. मात्र, जे माध्यमात दिसलं त्याप्रमाणे पुणे पोलिसांनी एका रेव पार्टीवर कारवाई केली आहे. त्यामध्ये काही लोक सापडले आहे. त्यामध्ये काही ड्रग्स वगैरे सापडले आहेत. पोलिस अधिकाऱ्यांकडून पूर्ण ब्रीफिंग घेतल्यानंतर यावर बोलू शकेल. मात्र प्राथमिकदृष्ट्या असा प्रकारचा गुन्हा त्या ठिकाणी घडल्याचा दिसून येत आहे.

मंत्री संजय शिरसाट आणि माधुरी मिसाळ यांच्यात बैठकांच्या मुद्द्यावरून झालेल्या पत्रव्यवहाराबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, असे पत्र लिहून कोणीही वाद निर्माण करू नये. मंत्र्यांनी आपापसात बोलावे आणि मंत्र्यांना काही अडचण असतील तर त्यांनी मला येऊन सांगावे. त्यातील अडचण दूर करता येईल. मंत्री आणि राज्यमंत्री दोघेही शासनाचे भाग आहेत. सर्व अधिकार मंत्र्यांकडे असतात. मंत्री जे अधिकार देतात ते राज्यमंत्र्यांचे अधिकार असतात. यात कुठलीही संशय नाही. मात्र, राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा अधिकार नाही असे मानाने चुकीचे आहे.

राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा अधिकार आहे. पण अशा प्रकारच्या बैठकांमध्ये काही धोरणात्मक निर्णय होत असतील, तर ते मंत्र्यांशी बोलल्याशिवाय घेऊ नये किंवा घेतल्या तर मंत्र्यांची मान्यता घेतली पाहिजे. मंत्री आणि राज्यमंत्री यांनी सामंजस्य दाखवले पाहिजे. काही अडचण असेल तर माझ्याशी बोलले पाहिजे, असे फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूर जिल्ह्याचा पुढील ३० वर्षाचा "कॉम्प्रेहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन" सर्व लोकप्रतिनिधी समोर ठेवण्यात आला. राइट्स या संस्थेला नागपूर जिल्ह्याचा पूर्ण कॉम्प्रेन्सिव्ह मोबिलिटी प्लान तयार करण्यास सांगितला होता, त्यात विद्यमान नागपूर शहर जिल्हा ग्रुप सेंटर भविष्यात निर्माण होऊ शकेल असे क्रोध सेंटर लक्षात घेऊन त्या ठिकाणी आवश्यक मोबिलिटीचा प्लॅन तयार करण्यात सांगितले होते. आताच्या मोबिलिटी प्लानमध्ये ज्या अडचणी आहेत त्या दूर करणे, रस्ते मोठे करणे नवीन रस्ते निर्माण करणे, अंडरपास किंवा वर पास तयार करणे उड्डाणपूल तयार करणे, बसची व्यवस्था करणे, ट्रॅफिक सिग्नल ची व्यवस्था पाहणे, फुटपाथ ची व्यवस्था पाहणे हे सांगण्यात आले होते. लवकरच जनतेसाठी हा कॉम्प्रेसिव्ह प्लान खुला केला जाईल जनतेकडून सूचना घेतल्या जातील.

## त्या दोनशे दिवसात दोन वेळा मरता-मरता राहिलो : धनंजय मुंडे



**ठाणे :** सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्यामुळे विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा मागितला व तो त्यांना द्यावा देखील लागला. त्यानंतर पासून धनंजय मुंडे हे फारसे कुठल्या सामाजिक कार्यक्रमात फारसे आले नव्हते. आज त्यांना वंजारी समाजाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात बोलावण्यात आले असता, भाषण करताना त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

धनंजय मुंडे म्हणाले, आजच्या कार्यक्रमाला पंकजा ताई येणार होत्या. पण त्या म्हणाल्या मी मागे राहते, भाऊ चालला आहे, माझे वतीने शुभेच्छा दे. त्यांच्या वतीने देखील मी तुम्हाला शुभेच्छा देतो. माझ्या जीवनातला पहिला संघर्ष मी मुंडे साहेबांचा पाहिला. त्यांच्या जीवनातील प्रवास आठवला तरी अंगावर काटा येतो. आज जे काही माझ्यासोबत झाले आहे ते मी सर्व स्वीकारीन. टीका स्वीकारीन, व्यक्ती म्हणून धनंजय मुंडेवर टीका करा. धनंजय मुंडे जर चुकला असेल तर त्याला माफ करू नका, जे काही असेल ते माझ्यापर्यंत राहावे, माझ्या जातीपर्यंत नसावे.

पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, दोष एका व्यक्तीचा असेल तर त्याला फाशी द्या. पण त्या आधारावर सगळ्या समाजाला दोषी ठरवू नका. धनंजय मुंडेच्या जिल्ह्यापर्यंत आई, बाप, मुलाबाळापर्यंत हे कधीच आले नव्हते. माझ्यासह माझी जात व माझा जिल्हा एवढा बदनाम करावा? एक-दोन दिवस नाही, दोनशे दिवस एखाद्या जिल्ह्याची, एखाद्या व्यक्तीची, एखाद्या व्यक्तीच्या जातीची मीडिया ट्रायल कधीच कोणी केली नसेल, ते मी सहन केले. त्या दोनशे दिवसात मी दोनवेळा मरता-मरता राहिलो. ज्या समाजात जन्माला आलो, त्याचा अभिमान निश्चित आहे. अडचणीच्या काळात ज्याला धनंजय मुंडेंचा नंबर आठवतो, यापेक्षा दुसरे काय हवे? मंत्रिपदाला काय चाटायचे आहे का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

माझ्यावर कृषिमंत्री असताना आरोप केले. नियतीने, न्यायव्यवस्थेने न्याय दिला. ज्यांनी कटकारस्थान केले, त्याच्या विरोधातच लाख रुपयाचा दंड झाला. सत्य परेशान हो सकता है, पराजित नही, असे धनंजय मुंडे म्हणाले. संघर्षात काय करायचे तर संयम ठेवायचा. गप्प राहिलो नसतो तर मला जो आजार आला, तो आला नसता. कारण माझा स्वभाव व्यक्त होण्याचा आहे. माझ्या वाणीवर सरस्वती मातेची कृपा आहे. जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष होईपर्यंत कधीच साहेबांच्या स्टेजवर मी नसायचो. संघर्षाच्या काळात आपण माझ्या डोक्यावर हात ठेऊन आशीर्वाद दिले. माझ्या स्वतःच्या अंगाची, माझ्या कातड्याची जोडी जरी आपल्या पायात घातली तरी ते फेटू शकत नाही, असेही मुंडे यावेळी म्हणाले.

## संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी : संजय राऊत

**मुंबई :** पुण्यातील खराडी भागात सुरू असलेल्या हाय-प्रोफाईल रेव्ह पार्टीवर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांच्यासह सहा जणांना ताब्यात घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. या घडामोडीवर आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी थेट भाजपवर घणाघात केला आहे. संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी आहे. अशा पद्धतीने पार्टी केल्याशिवाय हनीट्रॅप करता येत नाही, अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे. जेव्हा तुमच्यावर उलटेल तेव्हा महाग पडेल, असा इशाराही संजय राऊत यांनी दिला आहे.

संजय राऊत यांनी नुकताच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी संजय राऊत यांना पुण्यातील रेव्ह पार्टीबद्दल विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी थेट भाष्य केले. तुमचा संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी आहे, असा आरोप संजय राऊतांनी केला.

पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले, "माझ्याकडे याबाबत अद्याप संपूर्ण माहिती नाही, पण सध्याच्या सरकारच्या काळात कधी कोणाला अटक होईल, कधी कोणावर गोळीबार होईल, हे सांगता येत नाही. सरबत प्यायल्यावरही दारू प्यायल्याच्या आरोपाखाली अटक होते. हे सरकार आणि त्यांची यंत्रणा विरोधकांना त्रास देण्यासाठीच वापरली जात आहे."

ही संपूर्ण घटना राजकीय सूडापोटी घडवली गेली असू शकते, अशी शंकाही संजय राऊत यांनी व्यक्त केली आहे. एकनाथ खडसे यांनी गेल्या दोन दिवसांपासून सरकारविरोधात, विशेषतः गिरीश महाजन यांच्याविरोधात ठाम भूमिका घेतली होती. त्यांनी जाहीर आरोप केले, पुरावेही दिले. पण त्याची चौकशी करण्याऐवजी दुसऱ्याच दिवशी त्यांच्या जावयावर रेव्ह पार्टीचा आरोप ठेवून कारवाई करण्यात आली, असेही ते म्हणाले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ जुलै २०२५


# पशुपतेश्वर महादेव मंदिरात विविध कार्यक्रम



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** भांगशीमाता गडाच्या पायथ्याशी असलेल्या पशूपतेयश्वर महादेव मंदिराचा दुसरा वर्धापन वर्धापन दिन दि २९ जुलै श्रावण शुद्ध पंचमी मंगळवारी रोजी आहे. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांसह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

परमानंदगिरी महाराज यांच्या प्रेरणेतून लाल पाषानात हेमाडपंथी पशुपतेयश्वर महादेव मंदिर बांधण्यात आलेले आहे. या मंदिरात महादेवाची सव्वाचार फुट लांब व सव्वादोन फुट उंच अशी महादेवाची पिंड आहे. भांगशीमाता गडांच्या पायथ्याशी परमानंदगिरी महाराजांची कुटीया व गुरुकुल आहे.

येथे शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अल्पावधीतच भाविकांमध्ये लोकप्रिय ठरलेल्या या पशूपतेयश्वर मंदिराच्या वर्धापण दिनानिमित्त उद्या सकाळी सात ते दुपारी बारा वाजेपर्यंत रुद्राअभिषेक, रूद्रयज्ञ पार पडणार आहे. दुपारी एक वाजता स्वामी परमानंदगिरी महाराज यांचे प्रवचन, रक्तदान शिबीर, भांगशी गड परिसरात वृक्षारोपण आणि शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिराचे व्यवस्थापक सांडू पवार यांनी दिली आहे.

# बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी लक्षात घेता अभिषेक बंद



**खुलताबाद : (प्रा.योगेश रावते) :** वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिरात श्रावण महिन्यामध्ये येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून मंदिर समितीने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहे त्यात पार्किंग सुविधा आणि काही मेडिकल कॅम्पचेही आयोजन करण्यात आले आहे आणि मंदिराच्या गाभाऱ्यात अभिषेकासाठी गर्दी होत असल्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या शिवभक्तांना होणारी अडचण लक्षात घेता आता श्रावण महिन्यातील शनिवारी रविवारी आणि सोमवारी हे तीन दिवस गर्दीचे असल्यामुळे या दिवसात फक्त बाहेर नंदीजवळ अभिषेक करण्यात येईल तसेच मंगळवार बुधवार गुरुवार आणि शुक्रवार या दिवसांमध्ये गाभाऱ्याच्या आत मध्ये अभिषेक करता येईल अशी माहिती श्री घृष्णेश्वर देवस्थानचे उपाध्यक्ष योगेश टोपरे यांनी दिली आहे. वेरूळ खुलताबादसह परिसरात गेल्या दोन दिवसापासून होत असलेल्या पावसामुळे वाहनांची अतिशय गर्दी होत आहे खुलताबाद सह वेरूळ घाटात वाहतूक ठप्प होते तरी येणाऱ्या भाविक भक्तांनी वाहतूक मार्गात केलेल्या बदला नुसार प्रवास करावा व गैरसोय टाळावी असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.






# शिक्षकांच्या चुकीच्या बदल्या करणाऱ्या 'विन्सेस' कंपनीविरुद्ध न्यायालयात याचिका दाखल



**खुलताबाद : (प्रा.योगेश रावते)** 18 जून 2024 च्या जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या शासन निर्णयानुसार सध्या सुरू आहे ही प्रक्रिया 'विन्सेस' कंपनी मार्फत राबविली जात असून यामध्ये बदल्या करताना मोठ्या प्रमाणात चुकीचा अवलंब झालेला आहे शासन निर्णया मध्ये दिलेल्या निकाषानुसार बदली प्रक्रिया होत नसल्याची टीका होत आहे. 2024 चा जि.प. शिक्षकांच्या बदल्याचा शासन निर्णय नक्कीच उकृष्ट आहे आणी या शासन निर्णयानुसार बदल्या झाल्याच पाहिजे , परंतु शासन निर्णयास बगल देऊन ज्या प्रमाणे संवर्ग १ च्या बदल्याच्या प्रकाशित झालेल्या यादीनुसार अतिरिक्त पदस्थापना देण्यात आली आहे ,शासन निर्णयानुसार अतिरिक्त शिक्षकांच्या जागेवर पदस्थापना विन्सीस कंपनीने चुकीच्या पध्दतीने दिली ही फक्त विन्सीस कंपनीचीच चुक आहे , कारण प्रत्येक जि प ने विन्सीस कडे उपलब्ध असलेली म्हणजेच पोर्टवर असलेल्या Vacancy list मध्ये प्रत्येक शाळेतील मान्य पदे , अतिरिक्त पदे व बदली पात्र पदे दिलेली दिसतात , मग अतिरिक्त पदे शाळेवर आलीच कशी ? तसेच संवर्ग २ साठी प्रत्येक जि.प.ने जे पत्र काढले ते शासन निर्णयानुसारच आहे मग विन्सीस कंपनी संवर्ग २ मध्ये पात्र असलेल्या शिक्षकांना संपुर्ण जिल्हा भरातील जागा का दाखवत आहे ?

३० कि मी बाहेर जागेवर अर्ज भरले गेल्यास व त्या नुसार विन्सीस ने पदस्थापना दिली गेल्यास त्यावर जि.प. प्रशासन शिस्तभंगाची कार्यवाही करणार का ? परंतु विन्सीस कंपनी ३० कि मी च्या बाहेरील जागेचे पर्यायच भरण्यासाठी का दाखवत आहे? हा मोठा गंभीर प्रश्न आहे.संवर्ग ३ मध्ये पात्र शिक्षकांची सेवाजेष्ठता यादीत कनिष्ठ असलेल्या शिक्षक वरिष्ठ च्या आगोदर आलेले दिसते म्हणजेच येथेही विन्सीस चा सावळा गोंधळच आहे.या सर्व चुकीच्या गोष्टी मुळे विन्सीस कंपनी शासन निर्णया नुसार बदल्या करत नसल्यामुळे बऱ्याच शिक्षकावर अन्याय होणार आहे.शासन निर्णयास बगल देऊन बदल्या करू नये अशी मागणी होत आहे. या विरोधात शिक्षक समितीने न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

सर्व संवर्गाच्या बदल्या झाल्यानंतर अनेक शिक्षकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे शिक्षक समितीने या बदल्यात विन्स कंपनी विरोधात कोर्टात याचिका दाखल केली आहे अन्याय झालेल्या शिक्षकांना न्याय मिळेपर्यंत शिक्षक समिती थांबणार नाही. -विजय साळकर, जिल्हाध्यक्ष शिक्षक समिती, छत्रपती संभाजीनगर

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ जुलै २०२५


## कारगिल विजय दिनाच्या औचित्याने क्रांती चौक येथे संगीत सादरीकरणाचा कार्यक्रम संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** कारगिल विजय दिनाच्या औचित्याने क्रांती चौक येथे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या Symphony of CSMC School Band च्या वतीने एक आगळावेगळा व भावस्पर्शी संगीत सादरीकरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाने उपस्थित नागरिकांच्या मनाला स्पर्श करत शूर वीर जवानांना सलाम करत देशभक्तीचा अभिमान जागवला.

या अनोख्या सादरीकरणाची संकल्पना आणि पुढाकार महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक महोदय मा. श्री. जी. श्रीकांत साहेब यांचा होता. त्यांच्या प्रेरणेतून साकार झालेल्या या बँडने विविध देशभक्तिपर धून आणि गीतांच्या माध्यमातून शहीद जवानांना आदरांजली अर्पण केली.

कार्यक्रमाला नामदार मा. श्री. अतुल सावे साहेब (मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण विभाग,महाराष्ट्र राज्य ) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या समर्पणाचे आणि सादरीकरणाचे कौतुक करत त्यांचा गौरव केला.कार्यक्रमाचे समन्वयक श्री. ज्ञानदेव सांगळे आणि केंद्रीय मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी हे सकाळी आठ वाजल्यापासूनच कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून सर्व विद्यार्थी, संगीत शिक्षक आणि सहकाऱ्यांना योग्य दिशा देत, मेहनतीने मार्गदर्शन करत होते. त्यांच्या परिश्रमातून विद्यार्थ्यांनी आपले पहिलेच सादरीकरण अत्यंत यशस्वीपणे सादर केले.

## नेशनल स्टूडेंट यूनियन ऑफ इंडिया च्या प्रदेशाध्यक्षपदी छ.संभाजीनगरच्या सागर साळुंके यांची निवड



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** भारतीय राष्ट्रीय कांग्रेस च्या विद्यार्थी आघाडी असलेल्या नेशनल स्टूडेंट यूनियन ऑफ इंडिया च्या प्रदेशाध्यक्षपदी छ.संभाजीनगरच्या सागर साळुंके यांची निवड झाली असून नवनिर्वाचित #NSUI प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे यांचा राजेशजी मुंढे यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी ढवळे सर, राहुल संत, निलेश आंबेवडीकर, योगेश बहादुरे, शुभम तांबे, अभिषेक शिंदे, रोहित बनकर इ कॉंग्रेस पक्षाचे आणि NSUI चे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते .


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


## कै. दादासाहेब पाटील विध्यालय दहेगाव च्या विध्यार्थी चा स्नेहमीलन तब्बल २४ वर्षानंतर पुन्हा भरली शाळा




**दौलताबाद (जावेद अहेमद) :** कै .दादासाहेब पाटील विध्यालय दहेगाव च्या विध्यार्थी चा स्नेहमीलन तब्बल २४ वर्षानंतर पुन्हा भरली शाळा. कै दादासाहेब पाटील कृषी विध्यालय तालुका वैजापूर चे २०००/२००१ चे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे स्नेह मिलन अतिशय उत्साहात दौलताबाद येथे रविवारी पार पडले.

सर्व प्रथम दिवंगत शिक्षक ,वर्ग मित्रांना व वर्गातील मित्रांच्या नातलगांना श्रद्धांजली वाहण्यात आली तब्बल २४ वर्षा नंतर एकत्र आलेल्या मित्र मैत्रिणी चा उत्साह पाहण्या सारखाहोता यात वर्ग मित्र यांचा वाढदिवस असल्या मुळे सर्वांनी त्यांना शुभेच्छा देऊन वाढदिवस साजरा केला.

२४ वर्षा मध्ये वैयक्तिक जीवनात आलेल्या चांगल्या वाईट गोष्टींचा उहापोह सर्वांनी आपल्या मनोगतातुन केला.दुपारच्या स्नेह भोजना नंतर विविध गुण दर्शनाच्या कार्यक्रमातुन अनेकांणी आपल्या कला सादर केल्या, आंतक्षरी ने कार्यक्रमाची गमंत आणखीच वाढवली.शेवटी निरोपाची वेळ आली, एकमेकांचा निरोप घेताना पुन्हा लवकरच भेटण्याचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी शिक्षक संतोष मरमट, नारायण उगले,बाबू विराळे लिपिक,ऋषिकेश शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती

कार्यक्रम यशस्वितेसाठी मयूर कुलकर्णी, प्रशांत दारूनटे, योगेश देशमुख, निलेश काथार,बाबासाहेब मगर,गजानन वाघ, गणेश अस्वार यांनी परिश्रम घेतलेपुढील कार्यक्रम सहकुटुंब घेण्याचे ठेवूनसर्वांनी निसर्गाचे धन्यवाद मानले .आणि सामाजिक बांधिलकी जपून समाजाच्या उपयोगी पडण्यासाठी प्रयत्न करण्याचा दृढ निश्चय केला.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ जुलै २०२५

# जागतिक निसर्ग संवर्धन दिन : निसर्ग रक्षण हीच खरी शाश्वत प्रगती




**२८ जुलै** हा दिवस दरवर्षी जगभरात **"जागतिक निसर्ग संवर्धन दिन"** म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश निसर्गाचे अनमोल महत्त्व अधोरेखित करणे, पर्यावरणाच्या संरक्षणाबद्दल समाजात जाणीव जागृत करणे आणि निसर्गाशी सुसंवाद साधणारी जीवनपद्धती रुजविणे हा आहे. वाढते शहरीकरण, अनिर्बंध औद्योगिकीकरण, बेसुमार जंगलतोड, वाढते प्रदूषण, अनपेक्षित हवामान बदल, भूजल संकट आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या गंभीर समस्यांच्या पार्श्वभूमीवर, निसर्ग संवर्धन ही आता केवळ एक संकल्पना राहिलेली नाही, तर ती काळाची नितांत गरज बनली आहे. म्हणूनच या दिवशी केवळ सोहळे साजरे न करता, पर्यावरणपूरक कृतीची सुरुवात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

आज आपण ज्या भौतिक प्रगतीचा अभिमान बाळगतो, तिची मुळे खोलवर निसर्गात रुजलेली आहेत. आपल्याला मिळणारे अन्नधान्य, पिण्याचे पाणी, शुद्ध हवा, इंधन, औषधे, इमारतींसाठी लागणारी सामग्री, कापड, आणि संतुलित हवामान हे सर्व निसर्गाचीच देणगी आहे. परंतु, अलीकडच्या काळात मनुष्याने या नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर करून निसर्गाच्या समतोलाला धक्का दिला आहे. विकासाच्या ओघात अनेकदा आपण निसर्गाच्या मर्यादा ओलांडल्या आहेत. याच्याच परिणामी, आज हवामान बदल, पावसाचे अनियमित चक्र, वणवे, गारपीट, पूर, दुष्काळ, समुद्रसपाटीत वाढ आणि ध्रुवीय प्रदेशातील बर्फ वितळणे यांसारख्या नैसर्गिक आपत्त्यांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. हे निसर्गाने दिलेले धोक्याचे संकेतच आहेत.

भारतीय परंपरेत निसर्गाला नेहमीच देवतासमान मानले गेले आहे. नद्यांना 'माता', पृथ्वीला 'जननी', वृक्षांना 'कल्पवृक्ष' असे संबोधून आपल्या संस्कृतीत निसर्गपूजनाला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले आहे. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असे म्हणणारे संत तुकाराम महाराज आणि त्यांच्यासारख्या अनेक संत-महंतांनी निसर्गाशी एकात्मतेचा संदेश दिला आहे. याच दृष्टिकोनातून आपल्याकडे सण, उत्सव आणि धार्मिक विधींमध्येही निसर्गपूजनाचे घटक दिसून येतात. दुर्दैवाने, आधुनिक युगात हे नाते सैल झाले असून, निसर्ग फक्त एक साधन म्हणून वापरण्याची वृत्ती वाढली आहे.

आज निसर्गावर अनेक घातक परिणाम करणाऱ्या मानवी कृती घडत आहेत, त्यामध्ये अनिर्बंध वृक्षतोड, प्लास्टिक प्रदूषण, जंगल साफ करून वसाहती उभारणे, अनियंत्रित खाणकाम, रासायनिक शेती, कार्बन उत्सर्जन वाढवणारी वाहने, कारखाने आणि बेजबाबदार जीवनशैली इत्यादी. यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे आणि अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जैवविविधतेचा ऱ्हास हा निसर्ग चक्रातील एक महत्त्वाची कडी तुटण्यासारखा आहे. उदाहरणच द्यायचे झाल्यास, मधमाश्यांचे देता येईल. मधमाश्या नाहीशा झाल्यास परागीभवनाचा नैसर्गिक क्रम बिघडून त्याचा थेट परिणाम अन्न उत्पादनावर होऊ शकतो, असे अनेक अभ्यासक आणि विद्वान सांगत आहेत.

भारत सरकार आणि भारतातील विविध राज्य सरकारांनी पर्यावरण रक्षणासाठी अनेक कायदे आणि योजना लागू केल्या आहेत. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२, पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६, जल प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंधक कायदा, १९७४ यांसारखे कायदे पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाचे ठरतात. या कायद्यांची केवळ निर्मिती नव्हे, तर त्यांची प्रभावी आणि काटेकोर अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि जलविद्युत ऊर्जा यांसारख्या अक्षय ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवणे हे देखील निसर्ग संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. औद्योगिकीकरण करताना पर्यावरणाची काळजी घेणे, प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर नियम लागू करणे आणि त्यांचा नियमित पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

याव्यतिरिक्त, केंद्र आणि राज्य सरकारांनी पर्यावरण रक्षणासाठी अनेक महत्त्वाचे उपक्रम सुरू केले आहेत. जसे की ‘वन महोत्सव’, ‘राष्ट्रीय हरित मोहिम’, ‘नमामि गंगे योजना’, ‘इको क्लब्स’, ‘जलशक्ती अभियान’ आणि ‘सिंगल यूज प्लास्टिक बंदी’ अशा योजना व मोहिमा राबविल्या जात आहेत. संयुक्त राष्ट्रसंघानेही ‘शाश्वत विकास’ या उद्दिष्टांमध्ये निसर्ग संवर्धनाला अग्रक्रम दिला आहे. यासाठी प्रत्येक नागरिक, शाळा, महाविद्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंसेवी संस्था यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

शिक्षण ही निसर्ग संवर्धनाची गुरुकिल्ली आहे. शालेय जीवनापासूनच पर्यावरणविषयक शिक्षण अनिवार्य करणे, पर्यावरण अभ्यासाच्या माध्यमातून कृतीशील सहभाग देणे, वृक्षारोपण, जलसंवर्धन, जैवविविधता निरीक्षण, स्थानिक परिसंस्थेचे अभ्यास प्रकल्प यामार्फत निसर्गाशी मैत्री निर्माण करणे अत्यावश्यक आहे. लहानपणापासूनच मुलांना पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगितल्यास ते भविष्यात निसर्गाप्रती अधिक संवेदनशील राहतील. वृक्षारोपण मोहीम, स्वच्छता अभियान, ऊर्जा बचतीचे उपाय, जलसंवर्धन प्रकल्प आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सक्रियपणे सहभागी करून घेतल्यास त्यांच्यात पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण होईल आणि जबाबदार नागरिक म्हणून ते तयार होतील. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, प्रत्यक्ष अनुभवांतून पर्यावरणाचे महत्त्व शिकवणे अधिक प्रभावी ठरेल. 'एक विद्यार्थी – एक झाड' असा उपक्रम खेडोपाड्यातील शाळांमध्ये सुरू केला जाऊ शकतो. तसेच, शहरांमध्ये ‘टेरेस गार्डन’, ‘किचन गार्डन’ यांसारख्या शाश्वत उपायांचा प्रचार केला पाहिजे.

पर्यावरण संवर्धनासाठी आपण सर्वसामान्य लोकही आपला सक्रिय सहभाग देऊ शकतो. उदा. प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्या वापरणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे, पाण्याची आणि विजेची बचत करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे, स्थानिक फळे-भाज्या-धान्यांचा वापर करणे, रासायनिक खताऐवजी जैविक खतांचा वापर करणे इत्यादी कृतींतून मोठे सकारात्मक बदल शक्य आहेत. तसेच स्थानिक वनस्पती, पक्षी, प्राणी यांचे रक्षण करणे, त्यांची माहिती संकलित करून लोकांमध्ये पोहोचवणे हेही प्रभावी पाऊल ठरू शकते.

पर्यावरण संरक्षणात स्थानिक समुदायांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. अनेक आदिवासी समुदाय आणि ग्रामीण भागातील लोक शतकानुशतके निसर्गासोबत सहजीवन जगत आले आहेत. त्यांच्याकडे पर्यावरणाचे जतन करण्याच्या अनेक पारंपरिक पद्धती आहेत, ज्यांचा अवलंब करून आपणही निसर्गाचे रक्षण करू शकतो. स्थानिक गावपातळीवर जैवविविधता व्यवस्थापन समित्या, ‘पर्यावरण संरक्षण समित्या’ तयार करून लोकसहभागातून पाणवठ्यांचे संवर्धन, मंदिरांच्या आजूबाजूला वृक्षारोपण, ओला-सुका कचरा वेगळा करणे, जलसाठवण योजना आणि कंपोस्ट खत निर्मिती असे उपक्रम राबवू शकतो. यामध्ये महिला, युवक मंडळे, शेतकरी गट यांचा सहभाग घेणे आवश्यक आहे. निसर्ग म्हणजे केवळ जंगल नाही; तर तो आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग आहे हे आपल्या कृतीतून स्पष्ट झाले पाहिजे.

निसर्ग संवर्धन म्हणजे केवळ झाडे लावणे किंवा पाण्याची बचत करणे इतकेच नाही, तर त्यात नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करणे, वन्यजीवनाचे जतन करणे, पर्यावरणातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा योग्य व शाश्वत वापर करणे इत्यादी बाबींचा समावेश होतो. निसर्ग संवर्धनासाठी प्रत्येक व्यक्तीने आपापल्या पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. हे केवळ सरकार किंवा मोठ्या संस्थांची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपल्या दैनंदिन सवयींमध्ये छोटे बदल करूनही आपण निसर्गाच्या संरक्षणात मोठे योगदान देऊ शकतो.

भारतासारख्या विकसनशील देशात निसर्ग संवर्धनाचे महत्त्व अधिक आहे. आपल्या देशात विविध प्रकारची भौगोलिक परिस्थिती आणि समृद्ध जैवविविधता आहे. हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांपासून ते दक्षिण भारतातील उष्णकटिबंधीय पर्जन्यवनांपर्यंत, आणि पश्चिम घाटातील जैवविविधतेपासून ते सुंदरबनच्या खारफुटीच्या जंगलांपर्यंत भारताची निसर्गसंपदा अद्वितीय आहे. परंतु, वाढती लोकसंख्या, अनियंत्रित औद्योगिकीकरण आणि वेगाने होणारे शहरीकरण यामुळे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड दबाव येत आहे. जंगलतोड, नद्यांचे प्रदूषण, जमिनीची धूप आणि अनियोजित विकासामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. त्यामुळे, आपल्याला नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर कसा करायचा, यावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

शेवटी, आपण हे समजून घेतले पाहिजे की मानव आणि निसर्ग अविभाज्य आहेत. आपले जीवन निसर्गावर पूर्णपणे अवलंबून असल्याने, त्यांच्यात सुसंवाद असणे महत्त्वाचे आहे. विकासाची गती थांबवण्याऐवजी, तो निसर्गाला पूरक असावा. जागतिक निसर्ग संवर्धन दिन ही केवळ औपचारिकता नसून, आपल्या जीवनशैलीत मोठे बदल घडवण्याची एक अमूल्य संधी आहे. आपण 'निसर्ग पूरक विकास' स्वीकारल्यास आपली पृथ्वी हरित, सुरक्षित आणि समृद्ध होईल. निसर्ग संवर्धन हे एक निरंतर कार्य असून, त्यात प्रत्येक व्यक्तीचा सहभाग आवश्यक आहे. आपल्या भावी पिढ्यांसाठी सुंदर निसर्ग जपणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. निसर्ग आपल्या गरजांचा स्रोत नसून, तो आपल्या अस्तित्वाचा आधार आहे. निसर्गाशिवाय मानवी जीवन अशक्य आहे. म्हणून, या दिनानिमित्त वसुंधरेचे रक्षण करण्याचा निश्चय करूया. निसर्ग वाचेल, तरच आपण वाचू आणि आपले भविष्य सुरक्षित राहील! चला, निसर्गरक्षण आपली जीवनशैली बनवूया.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्र विषयाचे सहायक प्राध्यापक आहेत)**
**ईमेल –**
**bagate.rajendra4@gmail.com**
**मो. क्र. ९९६०१०३५८२**